# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ

दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक

## अधिसूचना

विद्यापीठाचे विविध प्राधिकरण जसे अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यासमंडळावरील विविध सदस्यांची निवडणूक दि.२७/०५/२०१२ रोजी घेण्यात येणार आहे. विद्यापीठ अधिनियम १९९८, कलम २३(२)(ओ), २३(२)(पी), २८(२)(एफ) व ३६(२)(बी) अन्वये, विविध प्राधिकरणावरील सदस्यांच्या निवडणुकांकरिताची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. सदर कार्यक्रमाची व सूचनांची माहिती वेळोवेळी **www.muhsnashik.com** या संकेतस्थळावर उपलब्ध केली जाईल.

विद्यापीठ अधिनियम १९९८ कलम २२(अ) अन्वये, विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा सदस्य म्हणुन निवडण्यासाठीच्या / नामनिर्देशित करणेसाठीच्या पात्रता शर्ती विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या आहेत. सदर पात्रतेच्या शर्ती विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहे.

सदर अधिसूचना सर्व संबंधितांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी जाहीर करण्यात येत आहे.

सही/-

डॉ. आदिनाथ सूर्यकर

कुलसचिव तथा

निवडणूक निर्णय अधिकारी

म.आ.वि.वि. नाशिक

जाक्र. मआविवि/निवडणूक/०६/२०१२

दिनांक : ३१/०१/२०१२